# जय जय राम कृष्ण हरी

राम... कृष्ण... हरी
वासुदेव... हरी

भगवान श्रीराम आणि श्रीकृष्ण हे विष्णूचे अवतार. भगवान श्रीराम यांचे अवतार कार्य संपले आणि त्यानंतर श्रीकृष्णाचा अवतार झाला. दोघांचा कालखंड भिन्न, दोघेही भगवान विष्णूचे अवतार तरीही त्या दोन्ही अवतारी पुरुषांची जेवढी तुलना होते तितकी विष्णूंच्या इतर अवतारांची होत नसावी, याचे मुख्य कारण त्यांचा संपूर्ण कालखंड, म्हणजे जन्म ते अवतार संपेपर्यंत असा विस्तृत आहे.

रामाचे भक्त आहेत तसेच श्रीकृष्णाचे भक्त आहेत. राम हा सूर्यवंशी तर कृष्ण यादवकुलीन. श्रीराम हे आदर्श पुत्र, आदर्श पती, आदर्श शिष्य, प्रत्येक बाबतीत मर्यादा सांभाळून वागणारे म्हणून 'मर्यादा पुरुषोत्तम', एक आदर्श व्यक्तिमत्व. त्याचवेळी श्रीकृष्ण म्हणजे व्यावहारिक तत्व समजवणारे, कुरुक्षेत्रावर गोंधळलेल्या अर्जुनाला कर्मयोगाचे परिपाठ देणारे.

"रामराया आपली 'चूक' पदरात घालेल परंतु श्रीकृष्ण आपली 'भूक' भागावेल. त्यामुळे रामराया रात्रीची शांत झोपेची हमी देतो पण सकाळी उठून कामाला जायचे बळ कृष्ण देतो."

रामरक्षा म्हणताना, भीतीचा लवलेश मनात राहत नाही कारण रामरायाचे रक्षा कवच असल्याची हमी असते पण मनात दुःख असताना कृष्ण आठवतो कारण त्या दुःखातून तोच कान्हा वाट दाखवेल ह्याची खात्री असते, जसा तो द्रौपदीचा सखा आणि अर्जुनाचा माधव होता. म्हणून तर भीती वाटली की आठवतो राम आणि दुःख झाले की कृष्णाला शरण गेल्यावर मिळतो आराम. त्यामुळे जगण्याचे तत्व गीता सांगते.

समतोल बुद्धी आणि विवेक मागावे प्रभू रामचंद्रांकडे पण व्यवहारातील चतुरपणा, वाटाघाटी आणि मनं जिंकण्याची हातोटी शिकावी कृष्णाकडून. प्रतिकूल परिस्थिती आणि संकटकाळी संयम शिकावा रामाकडून, तर शत्रूचे शंभर गुन्हे माफ केल्यावर दंड देणे शिकावे कृष्णाकडून. म्हणून 'रक्षणाय मम्' सांगतो रामराया तर.. 'सुखी ठेव' विनवतो माधवाला... सहनशक्तीचे मागणे रामराया, कृष्ण बसलाय कर्माचे फळ द्याया.. राम आदर्श पुरुष, आदरणीय त्यामुळे त्याला शरण जावे मात्र कृष्ण भासतो सखा, जणू त्याच्याशी बोलावे, वेळ पडली तर भांडावे.. इतका जवळचा सखा भासतो. रामाकडे क्षमा मागावी चुकांची तर कृष्णाला भीक मागावी मदतीची..

"प्रातः समयी भजावे रामासी
दिवसभर व्यवहारात आठवावे कृष्णाशी.."

अभ्यास करताना म्हणावे, 'रामो राज्यमणी' पण स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर व्यावहारिक आयुष्य जगताना कृष्णाची विनवणी .. म्हणून तर एकाचे दोन हात होताना घ्यावे रामाचे आशीर्वाद तर संसार करताना मात्र घ्यावा कृष्णाचा प्रसाद..

श्रीराम आरोग्यदायी तर श्रीकृष्ण सौंदर्यदायी. राज्य मिळवून देणारा श्रीराम, मात्र आपली सेना दुसऱ्याला देऊन सत्याच्या बाजूने सारथ्य करणारा श्रीकृष्ण... बरोबर की चूक सांगतो राम, तर चांगले वाईट ह्याचे भेद करणे कृष्णाचे काम... रामाकडे मागावे आई वडिलांचे आणि आप्तजनांचे क्षेम तर कृष्णाकडे मागावे मित्राचे प्रेम...

पाळण्यात नाव ठेवताना आठवतो गोविंद, गोपाळ पण अंतिम समयी घ्यावे लागते रामनाम.. म्हणून राम आणि कृष्ण हा भेदच कुठे राहतो जगताना.. राम कृष्ण दोन्ही हरीचे रूपं ते... म्हणून सदोदित स्मरावे दोघा, म्हणत, "जय जय राम कृष्ण हरी".

**- मनोज मोहन कुरुंभटी**